Rajdhani
DATE / /

नाव - प्रमोद गुणवंत देशमुख

महाविद्यालय नाव - श्री संपतराव माने महाविद्यालय खानापूर

विषय - अर्थशास्त्र . बी.ए. III

# * अर्थशास्त्र सेमीनार *

1) पूर्ण स्पर्धा संतुलन

2) कृषी विकास व नियोजन

3) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

4) सहसंबंध विश्लेषण

5) अमर्त्य सेन - आर्थिक विचार

2021-22

Rajdhani
DATE / /

* अमर्त्य सेन - आर्थिक विचार

① सामाजिक निवड - डॉ सेननी सामाजिक निवडीचा सिद्धांत मांडून कल्याणाच्या अर्थशास्त्रात महत्वाची भर घातली. या सिद्धांताने ॲरोच्या अशक्यता सिद्धांताने खंडन केले. त्यांच्या मते प्रत्येक व्यक्तीची पसंती लक्षात घेऊन त्यांची बेरीज करताना अडचणी येतात. मतभिन्नता असते हे टाळण्यासाठी हुकुमशाही पद्धतीची निवड केली जाते.

(अ) सामुहिक निवड पद्धती आधिक पद्धतशीर करणे. व्यक्तिगत पसंदीवर मर्यादा नसणे. व्यक्तिगत पसंती व सामुहिक पसंती यातील समानता पाहून निर्णय घेणे. इतरांची उपयोगिता स्थिर असताना किमान एकाची उपयोगिता वाढते.

सारांश -

विविधता, मतभिन्नता, संघर्ष असतानाही लोक आर्थिक धोरणाबद्दल सामुदायिक पसंती दर्शवू शकतात. परिणामी आर्थिक कल्याण साधता येते. मार्क अर्थशास्त्राला आदर्शवादाची जोड द्यावी असे सांगितले.

② सामाजिक क्षमता (सामर्थ्य) -

समाजाचे कल्याण साधण्यासाठी केवळ विषमता कमी करण्यासाठी संपती व उत्पन्नाचे हस्तांतरण उपयुक्त ठरत नाही, तर लोकांना सक्षम / सबल बनवणे गरजेचे असते. दारिद्र्य व विषमतेची समस्या सुटण्यासाठी लोकांमधील क्षमतेचा विचार करणे आवश्यक आहे. दुसऱ्यावर अवलंबून राहण्याच्या सवयीऐवजी स्व-संरक्षण सामर्थ्य विकसीत करणे.

Rajdhani
DATE / /

सामाजिक क्षमता विकसीत करणारे घटक-
शिक्षण, आरोग्य व सकस आहार हे क्षमता विकसीत करणारे महत्वाचे तीन घटक आहेत. शासनाने हस्तक्षेप करून सामाजिक क्षमतांच्या विकास केला पाहिजे

(अ) शिक्षण :
शिक्षणाच्या माध्यमाने ज्ञान संपादून आयुष्याचे नियोजन करता येते. शिक्षणाने समाजपरिवर्तन होते. चांगले-वाईट नफा-नुकसान, यातील फरक समजतो. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करता येते. शिक्षणाने लोक जागृत होतात. साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करता येतो. आर्थिक-सामाजिक विषमता, स्त्री पुरूष भेद नाहीसा करता येतो. सारांश डॉ सेन यांच्या मते शिक्षणाने जिवनाची गुणवत्ता सुधारते. आर्थिक सुधारणा व आर्थिक बदल होतात.

(ब) आरोग्य -
आर्थिक कल्याणात डॉ सेननी आरोग्याचे महत्व दिले. आरोग्य ही कार्यक्षमतेची पहिली अट आहे. आरोग्यदायी समाज आर्थिक कल्याणाचा द्योतक असतो. त्यांच्या मते समाजाला सक्षम बनविण्यासाठी सरकारने आरोग्यावर मोठी गुंतवणूक करावी. यामुळे मानवी साधनसंपत्तीचा गुणवत्ता वाढून काम करण्याची इच्छा व क्षमता वाढते.

* कृषी विकास व नियोजन - शेती हा भारतीय अर्थव्यवस्थे[चा]
कणा आजूनही समजला जातो, कारण भारतात शेती
क्षेत्रावर प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरित्या अवलंबून असणाऱ्यांचे प्रमा[ण]
60 टक्क्यांपेक्षा अधिक आहे पहिल्या पंचवार्षिक योजनेत
शेती क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले होते. पहिल्या व
तिसऱ्या योजनेत अन्नधान्याचे प्रत्यक्षात 68 दशलक्ष टन
80 दक्षलक्ष टन व 72 दक्षलक्ष टन झाले. चौथ्या पाच[व्या]
सहाव्या व सातव्या योजनेचे अन्नधान्याचे उत्पादन अनु[क्रमे]
108 दक्षलक्ष टन, 132 दक्षलक्ष टन, 150 दलक्ष टन व 171 द[क्ष]
लक्ष टन झाले.

नवव्या व दहाव्या योजनेचे अन्नधान्य
उत्पादन अनुक्रमे 210 दक्षलक्ष टन व 218 दक्षलक्ष टन झा[ले].
सन 1978 मध्ये भारतात अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपू[र्ण]
झाला. अन्नधान्याची आयात कमी झाली. फळे, भाजीपाला
शेतीमालाची निर्यात वाढली त्यामुळे बहुमोल परकीय
चलन बचत झाले. व प्रगती झाले.

शेती साठी आवश्यक खतांचा पु[र]
रवठा पाणीपुरवठ्याचा सोईत वाढ झाली. सन 1951-52
मध्ये सर्व प्रकारच्या खतांचा वापर 0.7 दक्षलक्ष टनावरू[न]
28.5 दक्षलक्ष टन इतका वाढला. सन 1950-51 मध्ये 22
दक्षलक्ष हेक्टरच्या पाणीपुरवठा 77 दक्षलक्ष हेक्टरपर्यंत
वाढला. आठव्या योजनेत यासाठी अनुक्रमे 82,780
कोटी रुपये व 28,587 कोटी व शेतीवर सन 1998-
च्या किमतीनुसार 37,588 कोटी रुपये खर्च करण्यात
येणार होते. तर दहाव्या योजनेत सिंचन व पूरनियंत्र[ण]
यावर 1,03,315 कोटी रुपये खर्च करण्यात येणार होते.
ही रक्कम एकूण योजना खर्चाच्या 8.4 टक्के होती.
शेती क्षेत्राच्या विकासाने चहा, कॉफी व दूध उत्पादनात
जगात भारताचा पहिला क्रमांक आहे.

Rajdhani
DATE / /

देशाच्या आर्थिक विकासामध्ये शेती उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्र महत्वाचे असते. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये शेती क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले होते व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले होते. दुसरी योजना ही उद्योगप्रधान होती. काही योजनांना अग्रक्रम देण्यात आला होता. मूलभूत व पायाभूत उद्योगांचा पाया घालण्य आला.

देशामध्ये अनेक उद्योगांना लागणारी यंत्रसाम देशात तयार होऊन लागल्याने त्यांची आयात घटून परकी चलनाची बचत झाली. यामुळे देशात कापड उद्योग, साख उद्योग, सिमेंट उद्योग, रसायन, पेत्रसामग्री, ऊर्जा, वाहतू इत्यादी उद्योगांचा विकास झाला. उद्योग व खनिजावर सार्वजनिक क्षेत्रात दुसऱ्या योजनेत 93.8 कोटी रुपये खर्च करण्यात आला. आठव्या योजनेत या क्षेत्रात व 78,065 कोटी रुपये खर्चाचे लक्ष्य होते. तर नवव्या योजनेत 69,972 कोटी रुपये व दहाव्या योजनेत 57,930 कोटी रुपये खर्चाचे उद्दीष्ट होते.

भारतीय नियोजनेत औद्योगिक प्रगती झाली. औद्यगिक उत्पादनाच्या निर्देशांक 1980-8 चे मूळ वर्ष मानून 100 झाला तर 1960-61 मध्ये 36.2 टक्के 1990-91 मध्ये 213 टक्के झाला. वार्षिक वा दर 5.9 टक्के भारतात. औद्योगिक प्रगतीमुळे पोलाद उत्पा सिमेंट उत्पादन यामध्ये प्रचंड वाढ झाली. भारतीय नियोजनाची सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची वाढ ही प्रमुख देणगी आहे. थोडक्यात, नियोजनामुळे भारत हळूहळू उद्योगप्रधान देश बनत आहे.

Rajdhani
DATE / /

* सहसंबंध विश्लेषण

दोन चलामध्ये असणारा संबंध म्हणजे सहसंबंध (co-relation) होय. उदा- लग्नाची वयोमर्यादा वाढल्यामुळे जननदर कमी झाला आहे हे विधान दोन चलातील सहसंबंध स्पष्ट करतात. एखाद्या जटिल समस्येच्या अभ्यास करताना अनेक कारक एखाद्या जटिल अशा वेळी साधारणमान, विस्कलन किंवा विचलन या विश्लेषण पद्धतीवरून निष्कर्ष काढण्यास मर्यादा पडतात.

① कॉन्नर (connar) यांच्या दोन किंवा अधिक चलांमधील माहिती भिन्न स्वरूपाची असली तरी जेव्हा त्यातील काही हालचाली अशा असतात की त्यांचे परिणाम एकाच प्रकारच्या असतात.

② प्रा. डब्ल्यू, आय किंग-
यांच्या मते दोन प्रोणी अथवा गटांच्या साधनसामग्रीत प्रासंगिक किंवा अन्य कारणाने काही संबंध आलेला असेल तर त्याला म्हणजे सहसंबंधाचे काही प्रकार सांगता येतील.

① धनात्मक सहसंबंध-
दोन्ही चले एकाच दिशेने बदलतात तेव्हा त्याला धनात्मक सहसंबंध म्हणतात म्हणजे एका चलात वाढ झाली असता दुसऱ्या चलात वाढ होत असेल. तसेच एका चलात घट झाली तर दुसऱ्या चलातही घट होते.

⑤ एका चलाच्या मूल्याच्या बदलाची सारी प्रमाणात होत असेल तर त्याला पूर्ण सहसंबंध म्हणतात उदा फिशरच्या मते पैशाची संख्या दुप्पट

Rajdhani
DATE / /

काही वेळा एका चलाच्या मूल्याच्या व बदलाशी चलाच्या मूल्यातील पैशाचे मूल्य निमपट होते काही वेळी एका चलाच्या मूल्याच्या बदलाशी दुसऱ्या चलाच्या मूल्यातील बदल त्याच प्रमाणात न होता काहिसे जवळपास होतात तेव्हा त्या सहसंबंधाला उच्च सहसंबंध म्हणतात वर्गात तासाला हजर असणारे कितेक पास होतात याउलट एका चलाच्या मूल्याती बदलापेक्षा दुसऱ्या चलाच्या मूल्यातील बदल कमी अंशात झाल्यास त्याला कमी सहसंबंध असे म्हणतात उदा सूर्यावरील डागांची संख्या वाढल्य मंदी येते हे विधान काहीअंशी खरे ठरते म्हण त्याला म्हणतात

आलेखाच्या साहाय्याने दोन चलांतील सहसंबंध दाखविला असेल आणि तो जर एक रेषेत असेल तर त्याला एकरेषीय सहसंबंध असे म्हणतात आलेखातील हा बदल एका सरळ रेषेत नसेल तो वक्र रेषेत असेल तर त्याला असे म्हणतात

सहसंबंध तंत्राचे महत्व

सहसंबंध अनुभवनिष्ठ परिणामाच्या आधारा अभ्यास भौतिकशास्त्रात अधिक होतो गणितशास्त्र दोन अथवा अधिक चलांतील संबंध प्रस्थापि करणे सुलभ असले तरी महत्व पुढील प्रमाणे मांडता येईल

सहसंबंधाच्या साहाय्याने एखाद्या प्रक्रियेचे नियंत्रण करणे शक्य बनते उदा एखाद्या ठरावीक वर्षी राष्ट्रीय महामार्गावरील अपघाता मध्ये का झाली याचे निरीक्षण करून त्याचे कारण कशात आहे हे जाणून अपघात कमी करता येऊ, ब

Rajdhani
DATE / /

* आंतरराष्ट्रीय नाणेनिधी -

विनीमय दर ठरवणे :- चलननिधीचे सभासदत्व स्विकारल्यानंतर प्रत्येक देशाला आपल्या चलनाचे मूल्य सोन्याच्या संदर्भात अगर अमेरिकन डॉलरमध्ये किती राहिल हे जाहीर करावे लागते व ते स्थिर ठेवण्याची त्या देशाची जबाबदारी असते या दरात १० टक्के बदलून आणण्याची परवानगी प्रत्येक राष्ट्राला असते.

① अल्पकालीन मदत -

एखाद्या सभासद राष्ट्राला आंतरराष्ट्रीय व्यवहारातून तात्पुरती मदत हवी असेल तत्कालीन देणे सोपे झाले तर ते देण्यासाठी चलननिधी त्या देशाच्या चलनाचा जो हिस्सा असेल त्याच्या २५ टक्के इतके दुस-या देशाचे चलनाचा उपयोग होतो.

② दुर्मीळ चलनाचे वाटप -

या चलननिधीकडे अनेक राष्ट्रांचे चलन असते परंतु ज्यावेळी इतर राष्ट्रांचे चलने असते त्यावेळी एकाच देशाच्या चलनाला इतर राष्ट्राकडून मोठ्या प्रमाणात मागणी येते. पण सर्वांची मागणी पूर्ण होत नाही.

③ विनिमय नियंत्रण दूर करणे -

सभासद राष्ट्रांची हुंडणावळीवरील नियंत्रणे दूर करावीत असा प्रयत्न केला जातो सध्या ब-याच राष्ट्रांनी हुंडणावळीवरील नियंत्रणे शिथील केली आहेत.

④ चलन सभाळणे -

एखाद्या राष्ट्राने आपल्या वाट्यापेक्षा निधीला जादा चलन दिले तर ते चलन सांभाळून त्यावर व्याजही जाते.

Rajdhani
DATE / /

परिवर्तनीय चलनामुळे भांडवली बाजारपेठा एकमेकांशी संबंधित झाल्या त्यामुळे निरनिराळ्या देशात व्याजाचे दर समान होण्याची प्रवृत्ती निर्माण झाली.

⑤ भरपाईयुक्त वित्तीय सुविधा -

अलिकडे नाणेनिधीने अनेक सुविधा निर्माण करून दिल्या आहेत. सन १९६३ पासुन नाणेनिधीचे प्रतिपूरक वित्तव्यवस्था सुविधा निर्माण केली. यामुळे प्राथमिक वस्तूंच्या निर्यातीवर अवलंबून असणाऱ्या देशांना निर्यातीच्या उत्पन्नातील घटीमुळे तोलेपातील तू भरून काढण्यास मदत होते. अशा अनेक देशांना त्यांच्या कोट्याच्या २५% एवढी परकीय मदत नाणेनिधी देते.

⑥ विस्तारीत निधी सुविधा -

नाणे निधीने सन 1974 पासून विस्तारीत निधी सुविधा संमत केली. विकसनशील देशांना अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडवून आणण्यास व विकासाचा सुयोग्य कार्यक्रम आखण्यास नाणेनिधीकडून मदत केली जाते.

⑦ तेलविषयक सुविधा -

सन 1973 नंतर तेलाच्या वाढत्या किमतीने अनेक देशांनी परदेशी तूट व्यापारात निर्माण केली. जागतिक निधी कडे ठेवलेले सोने व्यापारात त्यातून मिळणाऱ्या नफ्यातून एक न्यास निधी स्थापन करण्यात आला.

Rajdhani
DATE / /

* पूर्ण स्पर्धा संतुलन -
बाजाराचे स्पर्धेच्या दृष्टीकोणातून वर्गीकरण केल्यास बाजाराचे पूर्ण स्पर्धा मक्ते दारीयुक्त स्पर्धा, अल्पअधिकार असे प्रकार पडतात. पूर्ण स्पर्धा हा बाजाराच्या आदर्श स्पर्धा हा बाजाराच्या आदर्श मानला जातो. बाजारात पूर्ण स्पर्धा आणण्यासाठी काही अटी पूर्ण कराव्या लागतात. अशा अटी वैशिष्ट्ये ज्या बाजारात पूर्ण होतात तेथे पूर्ण स्पर्धा आहे असे म्हटले जाते. किंवा त्या बाजाराला पूर्ण स्पर्धा असे म्हटले जाते.

पूर्ण स्पर्धा म्हणजे काय याच्या अर्थ समजून घेण्यासाठी पूर्ण स्पर्धेच्या बाजाराच्या काही महत्वाच्या व्याख्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

① असंख्य विक्रेते -
पूर्ण स्पर्धेच्या बाजारात विक्रेत्यांची संख्या फार मोठी असते. त्यामुळे एखाद्या उत्पादन विक्रेत्याला आपल्या पुरवठा कमी जास्त करून एकून वस्तूच्या पुरवठ्यात बदल घडवून आणता येत नाही. प्रत्येकाचा वैयक्तिक पुरवठा हा महासागरातील एका पाण्याच्या थेंबासारखा असतो. त्यामुळे पूर्ण स्पर्धेत विक्रेता हा (Price maker) नसून किंमत स्विकारणारा असतो.

② असंख्य ग्राहक -
विक्रेत्याप्रमानेच पूर्ण स्पर्धेत वस्तूच्या गि-हाईकांची संख्यासुद्धा अमर्याद असते.

Rajdhani
DATE / /

③ समभावना -
वस्तूची खरेदी करण्यासाठी बाजारात गेलेले ग्राहक पूर्णग्रहदुषित मनाने गेले असता कामा नयेत विक्रेत्यांबद्दल त्यांच्या मनात समभाव असला पाहिजे

④ एकच किंमत
पूर्ण स्पर्धेत बाजारात सर्वत्र एकच किंमत असते वस्तूच्या किमतीत वाढ किंवा घट करणे अशक्य असते.

⑤ लवचीक मागणी वक्र -
पूर्ण स्पर्धेतील वस्तूची मागणी संपूर्ण लवचिक असते. म्हणजे एखाद्या विक्रेत्याने वस्तूची किंमत कमी केली जाते किंवा किमतीत अल्पशी वाढ केली जाते.

⑥ बाजारपेठेचे संपूर्ण ज्ञान-
ग्राहक आणि विक्रेता यांना त्या वस्तूच्या बाजारपेठेचे संपूर्ण ज्ञान असले पाहिजे म्हणजे वस्तूची किंमत, वस्तूचा प्रकार याबाबत संपूर्ण माहिती मिळते त्याचप्रमाणे ज्या उद्योग - संस्थांना

⑦ मागणी पुरवठ्याचे स्वातंत्र्य -
ग्राहकांनी कोणाकडून माल घ्यावा तो किती प्रमाणात घ्यावा यावर निर्बंध नसतात. तसेच पुरवठा करणाऱ्या उत्पादकांनी वस्तू कोणास किती प्रमाणात विकावी यावर निर्बंध घालतात.